**Impact Factor-8.575 (SJIF)** **ISSN-2278-9308**


# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**


**January-2023**

**(CCCLXXXVI ) 386 (D)**


## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE





**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr. Vilas Aghav**
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli



This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

**January-2023**

(CCCLXXXVI ) 386 ( D )

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Vilas Aghav
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386 D
ISSN : 2278-9308
January, 2023

# INDEX - D


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Indian Constitution and Human Rights | Dr. Maya S. Watane | 1 |
| 2 | .Indian Democracy and Supreme Court | Dr. Mane Sachin Babruvan | 4 |
| 3 | Human Rights and Literature | Mr. Amit M. Pawar | 9 |
| 4 | Judicial Interpretation of Human rights under Indian Constitution | Miss Sonali Bhagwandas Dad | 11 |
| 5 | Role of Citizens in Democracy | Mr.Ashok Kisan Wakade. | 14 |
| 6 | SAGAR - Comprehension of India's Maritime cooperation policy in IOR | Dr. Satish Karad | 17 |
| 7 | Critical Theory And Truth In Mahatma Phule's Sarvajanik Satya Dharma | Manasi Ahire | 23 |
| 8 | भारत में संविधान द्वारा स्थापित संसदीय शासन प्रणाली- एक समीक्षा | Dr Reena | 29 |
| 9 | रेणापुरकर के काव्यों में सामाजिक दृष्टि | डॉ. अखिलेश अ. शर्मा | 34 |
| 10 | राष्ट्र उभारणीत युवकांची भूमिकाb | प्रा.डॉ.दयानंद माधवराव गुडेवार | 42 |
| 11 | स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्याची भूमिका व चळवळीचे स्वरूप चिंतन | प्रा. डॉ. उमेश भ. पुजारी | 47 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचे स्मरण | प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे | 51 |
| 13 | भारतीय राजकीय व्यवस्थेत राज्यपालांची भूमिका | प्रा.मंदे सचिन संभाजीराव | 55 |
| 14 | रंगनाथ पठारे यांच्या कथालेखनाची भाषाशैली | प्रा. केशव विठ्ठल कोकाटे | 57 |
| 15 | मानव अधिकार विषयक संवैधानिक तरतुदी - एक राजकीय विश्लेषण | डॉ.सुरेश रावसाहेब खिस्ते | 63 |
| 16 | निवडणूक आयोग भूमिका आणि आव्हाने | स.प्रा.सुळे महिपाल रामराव | 67 |
| 17 | भारतीय संविधान आणि मानवाधिकार | डॉ विकास चांदजकर | 71 |
| 18 | भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांचे विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा. डॉ. रमेश शेवाळे | 73 |
| 19 | लोकप्रशासनातील ताण-तणाव व्यवस्थापन | शिवाजी धोंडीबा चांदणे | 78 |
| 20 | ७५ वर्षांतील 'संविधानाची उद्देशिका' एक आवलोकन | प्रा. डॉ. दयाराम द. मस्के | 87 |

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- D
ISSN : 2278-9308
January, 2023

# ७५ वर्षांतील 'संविधानाची उद्देशिका' एक आवलोकन

प्रा. डॉ. दयाराम द. मस्के
लोकोप्रशासन विभाग प्रमुख आदर्श महाविद्यालय, हिंगोली

७५ वर्षांत स्वातंत्र्योत्तर काळात भारतानं सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक नसली, तरी भरीव प्रगती संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून केली आहे. महात्मा गांधींनीस्वातंत्र्यलढ्यात जी मूल्ये विकसित केली आणि भारतीय संविधानात ज्यांनी जाणीवपूर्वक समाविष्ट करून रक्तविहिन सामाजिक व आर्थिक क्रांतीचा मार्ग भारतीयांना दाखवला, ते भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आज जिला आपण 'संविधानाची उद्देशिका' म्हणून जाणतो, त्याचा 'Objective Resoulation)चा ठराव मांडणारे व संविधानाला आकार देणारे पंडित नेहरू आणि 'मूलभूत हक्क सल्लागार समिती' आणि 'अल्पसंख्याक आणि आदिवासी अधिकार समिती' या दोन महत्त्वाच्या समित्यांचे अध्यक्ष सरदार पटेल या त्रिमूर्तींनी सिद्ध केलेले सांविधानिक तत्त्वज्ञान आणि मूल्ये किती प्रमाणात आपण साकार करू शकलो आणि देशवासीयांच्या जीवनात किती गुणात्मक बदल घडवून आणत त्यांना प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार मिळवून देऊ शकलो, याचा विचार करण्याचा क्षण भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानं आपणांस दिला आहे.

तो साधून प्रत्येक भारतीयांना संविधानाने स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची हमी (न्याय आणि समाजवाद - धर्मनिरपेक्षतेसह) दिली होती, ती किती प्रमाणात नागरिकांना – खास करून दलित, आदिवासी वंचित, स्त्री वर्ग आणि अल्पसंख्याक वर्ग समूहास प्राप्त झाली? त्याचे आज सिंहावलोकन करणे आवश्यक आहे. त्याचे भान देण्याचा एक छोटा पण महत्त्वाचा हा प्रयत्न आहे. तो देशाच्या भवितव्याचा विचार करणाऱ्या प्रत्येकास निश्चितच बोधप्रद ठरेल.

येथे मला वाचकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान निर्माणाचे काम पूर्ण झाल्यानंतर केलेल्या संविधान सभेतील सर्वाधिक महत्त्वाच्या, २५ नोव्हेंबर १९४९च्या भाषणाच्या एका संदर्भाची आठवण करून द्यायची आहे. तो संदर्भ आहे सामाजिक लोकशाहीचा. ते आपल्या भाषणात म्हणाले होते,"सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवनमार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्त्व म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांच्या एका त्रयींचा स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही, ते त्रयीचा एक संघ निर्माण करतात. समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येणार नाही. कारण समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही मूठभर लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व मिळवणे होय आणि बंधुतेविना स्वातंत्र्य आणि समता स्वाभाविकरीत्या अस्तित्वात राहणार नाहीत."

धर्मसत्ता आणि राजेशाही-बादशाहीमुळे सर्वसामान्य भारतीयांना एकोणिसाव्या शतकापर्यंत मूठभरअभिजनवर्ग वगळता फारसे स्वातंत्र्य नव्हते. तसेच धर्मसत्तेमुळे (विशेषत्वाने चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या 'मनुस्मृती'मुळे) दलित, आदिवासी व बहुजन समाजाच्या वाट्याला केवळ अन्याय व अत्याचार आले, तर पितृसत्तेमुळे (जी धर्मसत्तेचाच एक अविभाज्य भाग होता) भारतीय स्त्रीवर्गाची अवस्था दलितांहूनपददलित अशी शोचनीय होती. या सर्व वर्गसमूहाचेमाणूसपण नाकारले गेले होते व हा अन्याय हे वर्गसमूह नाइलाजाने सहन करत जगत होते.

स्वतंत्र भारतात ज्यांना अल्पसंख्याक म्हटलं जातं, त्यांपैकीमुस्लीम आणि ख्रिश्चन नागरिकांना (त्यातही मुस्लीम नागरिकांना) पण आज देशात राजकीय स्वातंत्र्य मिळत नाही आणि समतेच्या संदर्भात विचार करायचा झाला, तर ती दलित, आदिवासी, स्त्री आणि अल्पसंख्याक समाजापर्यंत अपेक्षित प्रमाणात पोचली असेल असं चित्र नाही. मग राजकीय प्रतिनिधित्वाची समता असो की शिक्षण, रोजगाराबाबतची आर्थिक समता असो; वर्ग, जात, लिंग व धर्मावरून भेदभाव न करता सर्वांना मिळणारी दर्जाची हमी असो, की संधीची समानता; त्यापासून हा बहुतांशवर्गसमूह अजूनही कोसो दूर आहे, असंच म्हणावं अशी विपरीत परिस्थिती आहे.

त्याची दोन कारणे प्रामुख्याने नमूद करता येतील. एक म्हणजे 'एक माणूस, एक मत आणि एक मुल्य अर्थात One Man, One Vote and One Value' या राजकीय लोकशाही आणि पंचवार्षिकनिवडणुकींपलीकडे आपण पुढे गेलोच नाहीत. डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारी सामाजिक लोकशाहीसाठी कोणत्याही पक्षाने वा सरकारने बांधीलकी म्हणत तळमळीने समग्र स्वरूपात प्रयत्न केला नाही आणि दुसरे कारण म्हणजे स्वातंत्र्य व समता खऱ्या अर्थाने साकार होण्यासाठी व शेवटच्या घटकापर्यंत पोचण्यासाठी लागणारे सामाजिक सौहार्द आणि एकतेची भावना बंधुतेच्या अभावी सर्व नागरिकांच्या - खास करून उच्चवर्णीय अभिजन वर्गाच्या मनात एक शांततामयसहअस्तित्वाने जगण्याचा जीवनमार्ग म्हणून रुजवण्यात आपण एक देश व भारतीय म्हणून कमी पडलो आहोत.

भारताच्या ७५ वर्षांतील झालेल्या नेत्रदीपक प्रगतीचा आपण साऱ्या भारतीयांना अभिमान वाटायला हवा. पण त्याचबरोबर स्वातंत्र्य, समता आणि बंधुता (न्याय - सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायासह) या सांविधानिकमूल्यत्रयींचे - जी माणसाला सन्मानाने व प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार देते - लाभ किती प्रमाणात सामान्य, गरीब माणसांपर्यंत पोचले याचा अग्रक्रमाने विचार करणे आवश्यक आहे. येथे 'सर्वोदय' व त्याचा पहिला टप्पा म्हणून 'अंत्योदय' ही शासनाची भूमिका असली पाहिजे. तशी ती 'लिप सर्व्हिस' म्हणून आहे, पण त्याचा अंमल होत नाही, ही खरी समस्या आहे. प्रस्तुत शोध निबंधात या परिप्रेक्ष्यात स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा समग्र आढावा विविध लेखांद्वारे घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

भारतीय संविधानाने अनुच्छेद १९ अन्वये

(अ) भाषण आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य – ज्यात मुद्रण स्वातंत्र्याचा समावेश आहे,

(ब) निःशस्त्र सभा संमेलनाचे स्वातंत्र्य,

(क) संघटनांचे स्वातंत्र्य,

(ड) भारतात सर्व प्रवेशात करण्याचे स्वातंत्र्य,

(इ) देशात कुठेही निवास करण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य,

(फ) कुठलाही व्यवसाय, व्यापार आणि धंदा करण्याचे स्वातंत्र्य, अशा सहा प्रकारचे स्वातंत्र्य प्रत्येक भारतीय नागरिकास बहाल केले आहेत. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य व व्यवसाय, धंदा करण्याचे स्वातंत्र्य वगळता सर्वांना बाकीच्या स्वातंत्र्याचा सर्वसाधारणपणे उपभोग घेता येतो, हे या ७५ वर्षांच्या स्वातंत्र्योत्तर भारताच्या वाटचालीचे यश म्हणता येईल.

पण आजही दलित समाजास व्यवसाय, धंदा व व्यापार करण्याचे स्वातंत्र्य पूर्णांशाने मिळालेले नाही. आजही त्यांना नाइलाजाने व जातिपातीच्या गावातील उतरंडीमुळे मेलेली जनावरे ओढण्याचे व कातडे काढण्याचे काम करावे लागते. 'मॅन्युअलस्कॅव्हेंजिंग' - हाताने विष्ठा वाहून नेण्याचे काम करावे लागते. त्यांच्यासाठी काम करणाऱ्याबेझवाडा विल्सन यांनी २ ऑक्टोबर २०२२ च्या अंकात गांधी जयंती दिनी यावर खंत व्यक्त केली आहे, ती विसरून चालणार नाही.

यापूर्वी २०१९मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनीप्रयागराजला एका सफाई कर्मचाऱ्याचे पाय धुतले होते, तेव्हा विल्सन यांनी 'क्लिनयुवरमाईंड, नॉटअवरफीट' अशी तिखट प्रतिक्रिया दिली होती. तसेच भाषण व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आज जो चहूबाजूंनी संकोच होत आहे, तो राजकीय लोकशाहीसोबत एकूणच लोकशाही व्यवस्थेसाठी घातक आहे. विशेषत्वाने कलावंत, विचारवंत आणि बुद्धिजीवी लोकांच्या अभिव्यक्तीवर आज ज्याप्रमाणे केंद्राचे भाजप सरकार (आणि अनेक इतर पक्षांची राज्य सरकारे - खास करून पश्चिम बंगाल) घाला घालत आहे, देशद्रोह व 'युपा''सारख्या कायद्याचा बेछूट वापर करून तुरुंगात पाठवत आहे किंवा समाजमाध्यमांवर प्रचंड ट्रोलिंग होत आहे, त्यातून मग पेरूमलमुरूगनसारखा लेखक 'लेखक मुरूगन मेला आहे', असं फेसबुकवर जाहीर करतो, ही कलावंताच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गळचेपीची परमसीमा आहे. तिला जसं सरकार नामक एकाधिकारशाहीगाजवणारी यंत्रणा कारणीभूत आहे, तसंच जाती-धर्माच्या टोकदार अस्मितेच्या गंडातून विरोधी मतांवर तुटून पडणारी वर्गसमूहाची टोळधाड पण आहे... एक देश म्हणून आपण कलावंतांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य पुरेशा प्रमाणात देत नाही आहोत.

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- D
ISSN : 2278-9308
January, 2023

महापुरुषांची विधायक चिकित्सा करणे, धर्मातील प्रथा - परंपरांतील अनिष्ट बाबी दाखवून देणे किंवा सरकारी धोरणावर टीका करणे आज बरेच अवघड झाले आहे. या संदर्भात दिया खान, युनेस्कोची 'आर्टिस्टिकफ्रीडम अँड क्रिएटीव्हिटी'च्या सदिच्छा राजदूतचे एक मार्मिक निरीक्षण भारतीय समाजाला पूर्णपणे लागू पडतं. ते असं आहे – "कलावंतांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आज जगात सर्वत्र धोक्यात आला आहे. खरे तर कलेमध्ये प्रतिकार, बंडखोरी, विद्रोह करण्याची व उमेद देण्याची असाधारण क्षमता असते. ती बहरणाऱ्या लोकशाहीला महत्त्वाचे योगदान देते."

आज भारतातली लोकशाही उत्तरोत्तर बहरत जाण्याऐवजी ती कोमेजत चालली आहे. कारण अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा होणारा संकोच. त्यामुळे स्वातंत्र्य हे संवैधानिक मूल्य आपण देशवासीयांनानिर्भेळपणे देण्यात सरकार व समाज अपयशी ठरला आहे, हे कटू वास्तव आहे. त्याचा आपण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात गांभीर्याने विचार केला पाहिजे.

अमेरिका, फ्रान्स आदी संपूर्ण स्वातंत्र्य देणारे देश आणि रशिया, चीनसारखे ते पूर्णपणे (किमानपक्षी राजकीय स्वातंत्र्यातही) दडपून टाकणाऱ्या दोन ध्रुवांमध्ये आपण कुठे आहोत, आपली वाटचाल निर्भेळ स्वातंत्र्याच्या दिशेने होत आहे का? की त्याच्याविरुद्ध दिशेने, याची प्रत्येकाने मनाशी पडताळणी करून जे स्वातंत्र्य नाकारायचा प्रत्येक स्तरावर प्रयत्न करतात, त्यांचा तेवढ्याच चिकाटीने प्रतिकार करण्याचा प्रत्येक नागरिकाने प्रयत्न केला पाहिजे. कारण स्वातंत्र्य हे भीक मागून मिळत नाही, ते संघर्ष करून मिळवावं लागतं आणि डोळ्यांत तेल घालून अहर्निश जपावं लागतं.

'समता' हे दुसरे सांविधानिक मूल्य आहे. पण धर्मसत्ता, पितृसत्ता आणि स्पर्धात्मक राजकारणामुळे उत्तरोत्तर अधिकच घट्ट होत जाणारी जातिव्यवस्था व जातनिष्ठ टोकदार (अहंकार म्हणावी एवढी टोकाची) अस्मिता यांमुळे समतेचा प्रश्न जटिल झाला आहे. समतेचे असंख्य पैलू आहेत; पण सामाजिक व आर्थिक समता सर्वाधिक महत्त्वाचे आहेत. रोहित वेमुला या दलिताची व डॉ. पायल तडवी या आदिवासीमुस्लीम डॉक्टर युवतीची आत्महत्या दलित, आदिवासी, अल्पसंख्याक आणि स्त्री वर्ग आजही सामाजिक समतेपासून किती दूर आहे, याचे निदर्शक आहेत. त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी सामाजिक लोकशाहीचा म्हणजेच समतेचा आग्रह संविधान सभेतील त्यांच्या शेवटच्या भाषणात केला होता. वंचित समाजास समता आणि मानवी प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. कारण त्यांना हे माहीत होते की, भारतीय समाजात दोन बाबींचा संपूर्ण अभाव आहे.

पहिली बाब म्हणजे समतेचा अभाव (कारण जातिव्यवस्था व चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्त्वावर जगणारा भारतीय समाज) दुसरी बाब म्हणजे प्रचंड आर्थिक विषमता. त्यासाठी संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वात प्रत्येक स्त्री व पुरुषाला रोजगाराची हमी, संपत्तीचे विकेंद्रीकरण, सार्वजनिक साधनांची सामुदायिक मालकी या व अन्य आर्थिक समतेसाठीच्या बाबी आणि व्यक्ती व समूहाचा दर्जा, सुविधा व संधीची समानता, भेदभाव विरहित व्यवसाय स्वातंत्र्य आणि प्रत्येकाला मानवी प्रतिष्ठा, या सामाजिक समतेच्या बाबीसाठी भावी राज्यकर्त्यांसाठी दिशा दिग्दर्शन केले आहे, पण आपल्या राजकीय पक्ष व निवडून येणाऱ्या सरकारने त्या दृष्टीने फारसे प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत, हे मत स्पष्टपणे नोंदवले पाहिजे.

भारतातील हिंदू धर्मातील (धर्माधिष्ठित आणि मनूप्रणीत) विषमता ही धर्मांतरामुळे व इथल्या असमानतेच्याडीएनएमुळेमुस्लीम व ख्रिश्चनांतही दृढमूल झाली आहे. त्यामुळे आज धर्मांतरित ख्रिश्चन व मुस्लीम यांना आरक्षण देण्याचा प्रश्न पुढे आला असून सर्वोत्तम न्यायालय त्याबाबत विचार करत आहे. एकूणच समतेचा प्रश्न ७५ वर्षांत समाधानकारक रीतीने सुटला तर नाही, उलटपक्षी तो उत्तरोत्तर जटिल होत चालला आहे. त्याची लख्ख जाणीव 'समता' विभाग वाचकांना करून देईल आणि विचार तसेच कृतिप्रवण करण्यास प्रोत्साहन देईल.जरा खोलवर जात विचार केला, तर असे लक्षात येईल की, संविधानातील बंधुता - फॅटर्निटी - हे मूल्य खऱ्या अर्थाने आपण न स्वीकारल्यामुळे आणि ते देशात डोळसपणे रुजवण्याचा प्रयत्न न झाल्यामुळे नागरिकांना स्वातंत्र्य व समता मिळत नाही.

या मूल्यत्रयींना जर आपण त्रिशूलाची उपमा दिली, तर त्यातील बंधुता हे मधले स्वातंत्र्य व समतेच्या टोकापेक्षा अधिक उंच व मोठे असणारे टोक आहे. ते एका बाजूला स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करते, तर दुसऱ्या बाजूला समतेच्या मार्गावरील विषमतेचे काटे दूर करण्यास मदत करते.बंधुतेची व्याख्या काय असं जर मला कोणी विचारलं तर संत ज्ञानेश्वरांच्यापसायदानाचं 'भूतापरस्परे पडो, मैत्र जिवाचे' हे मागणं आणि 'वसुधैवकुटुम्बकम्' हा विचार होय. राष्ट्रसंततुकडोजी महाराजांचा पुढील अभंग बंधुतेची समग्र व्याख्या करणारा आहे- 'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, वरचि असा दे, हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे... हा जातिभावविसरूनिया, एक हो आम्ही, अस्पृश्यता समूळ जगातुनी'. महात्मा फुले तरी वेगळं काय सांगतात? - 'मानव सारिखेनिर्मिलेनिर्मिक कमी नाही केले कोणी एक'. डॉ. आंबेडकरांनी बुद्ध धम्मातून 'मेटा' (मैत्री) हे मूल्य संविधानात फॅटर्निटी म्हणून आणले, हे सर्वश्रुतच आहे.

ब्राझिलचे संविधान 'फॅटर्निट सोसायटी' (भ्रातृ/ भगिनीभाव असलेला) समाज निर्माण करण्याचे ध्येय बाळगतो. दक्षिण आफ्रिकेने (थँक्स टू नेल्सन मंडेला) जगाला एक सुंदर शब्द दिला आहे – 'उंबटू'. म्हणजे 'शेअरसॉलिडॅरिटीअँजकॉन्स्टिट्यूशनलव्हॅल्यू'. झुलू भाषेतला या शब्दाचा अर्थ आहे- 'आय अॅमबिकॉजवुई आर' अर्थात 'मी आहे कारण आम्ही आहोत'. मी नाही तर आम्ही. यापेक्षावंधुता / भगिनीभाव किंवा मैत्रभाव आणखी कोणता असू शकतो?

बंधुतेच्या संदर्भात नंदिनी सुंदर विरुद्ध छत्तीसगढ राज्य (२०११) चा सर्वोच्च न्यायालयाच्यानिकालाद्वारेबंधुता हे मूल्य किती महत्त्वाचे आहे, यावर मार्मिक भाष्य केले आहे. सदर निकालपत्रात असे म्हटले आहे की, एक जबाबदार राज्य म्हणून एखादे राज्य काम करते की नाही हे पाहण्यासाठी बंधुतेच्या तत्त्वाची कसोटी लावणे योग्य ठरेल. सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय संवर्धित केला तरच बंधुतेचेसंवैधानिक मूल्य साकार होईल. या निकालपत्राचे खास वैशिष्ट्य म्हणजे 'बंधुता' या मूल्यास मध्यवर्ती मानून निकाल दिला आहे, तसेच बंधुता, मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे यांच्यामधीलपरस्परसंबंध स्पष्ट करून त्यांचे सांविधानिक महत्त्व अधोरेखित केले आहे.

आज देशात धार्मिक ध्रुवीकरणामुळे हिंदू विरुद्ध मुस्लीम (व ख्रिश्चन) अशी परस्परांकडे द्वेष व आकसाने पाहणारी भावना जशी वाढत आहे, तशीच जात संस्था जराही खिळखिळी झाली नसल्यामुळे सवर्ण-दलित, अभिजन-बहुजन अशी सामाजिक दुफळी पण अधिकाधिक रुंदावत चालली आहे. आणि जागतिकीकरण आणि बाजार केंद्रित अर्थव्यवस्थेमुळे स्त्री देहाचे 'ऑब्जेटिफिकेशन' होत असून सुशिक्षित स्त्री त्याला दुर्दैवाने बळी पडताना दिसत आहे. त्यामुळे स्त्री-पुरुषातली लिंगविरहित मैत्रीची जागा विकृतीनं घेतली आहे. त्यामुळे स्त्रीवरील अत्याचार वाढत चालले आहेत.

या पार्श्वभूमीवर बंधुता या सर्वाधिक महत्त्वाच्या मूल्याचे समग्र तत्वज्ञान आणि संकल्पना समजून घेत आजचे वास्तव पण पाहिले पाहिजे.

सर्व सुजाण-विचारी वाचकांना शेवटी एवढंच सांगणं आहे की, तुम्ही-आम्ही सर्वांनी आपल्या जीवनात जाणीवपूर्वक या मूल्यत्रयीचे पालन केले पाहिजे. आपले तसेच कलावंताचे स्वातंत्र्य जपण्यासाठी आवाज उठवला पाहिजे. त्यासाठी समाजमाध्यमांचा विवेकी वापर केला पाहिजे. कलावंतांना 'आम्ही तुमच्यासोवत आहोत' असा दिलासा व उमेद दिली पाहिजे आणि स्वत:च्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुप, सवर्ण-दलित, हिंदू-मुस्लीम असा भेदभाव करणे टाळले पाहिजे. त्यासाठी स्वत:च्या मनात समतेचे मूल्य रुजवले पाहिजे.हे केले की, एकप्रकारे समाज जीवनात सहजतेने बंधुता प्रस्थापित होईल. थोडक्यात, आपण ही मूल्यत्रयी मन, विचाराने स्वीकारून होता होईल तेवढी कृतीत आणली पाहिजे.

संदर्भ

1. https://www.legalserviceindia.com/article/l26-PREAMBLE-A-PART-OF-THE-CONSTITUTION-OR-NOT.html
2. https://legislative.gov.in/constitution-of-india/preamble-to-the-constitution-of-india?page=1
3. //efaidnbmnnnibpcajpcglclefindmkaj/https://img1.wsimg.com/blobby/goebd848cd-b7d3-4983-97dd4f3ff071e103/downloads/THE%20PREAMBLE%20OF%20INDIAN%2CONSTITUTION%20.pdf?ver=1592567133903